CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. ०८.१०.२०२१**

**नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासासाठी सिडकोने केलेले काम कौतुकास्पद – मा. ना. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र**

**"नवी मुंबईचा सर्वांगीण विकास व्हावा याकरिता सिडकोने आजतागायत केलेले काम हे निश्चितच कौतुकास्पद आहे", असे उद्गार श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे, मा. ना. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी काढले. सिडको महामंडळाने नवी मुंबईतील कळंबोली आणि मुंबईतील कांजूरमार्ग येथे उभारलेल्या कोविड समर्पित आरोग्य केंद्रांचे ई-लोकार्पण आणि सिडकोने आयोजित केलेल्या सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीटचे ई-अनावरण ०८ ऑक्टोबर २०२१ रोजी दूरस्थ पद्धतीने मा. मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.**

या प्रसंगी मा. मुख्यमंत्र्यांसह मा. ना. श्री. बाळासाहेब थोरात, मंत्री, महसूल, मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगर विकास, मा. ना. श्री. आदित्य ठाकरे, पालकमंत्री, मुंबई उपनगर, मा. ना. श्रीमती आदिती तटकरे, पालकमंत्री, रायगड, मा. श्रीमती. किशोरी पेडणेकर, महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका, मा. श्रीमती. कविता चौतमोल, पनवेल महानगरपालिका, मा. ना. श्री. प्राजक्त तनपुरे, राज्यमंत्री, नगरविकास, मा. ना. श्री. श्रीरंग बारणे, खासदार, मा. ना. श्री. राजन विचारे, खासदार, मा. ना. श्री. मनोज कोटक, खासदार, मा. श्री. बाळाराम पाटील, विधानपरिषद सदस्य, मा. श्री. प्रशांत ठाकूर, आमदार, मा. श्री. सुनील राऊत, आमदार यांसह श्री. इकबाल सिंह चहल, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, श्री. गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महानगरपालिका, श्री. राजेंद्र धयाटकर, मुख्य अभियंता (नमुंआंवि), सिडको आणि सिडकोतील विभाग प्रमुख व अधिकारी ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

**या प्रसंगी बोलताना मा. मुख्यमंत्र्यांनी सिडकोने अल्पावधीत कोविड समर्पित आरोग्य केंद्रे उभारल्याबद्दल सिडकोचे अभिनंदन केले. तसेच सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट यासारख्या कार्यक्रमांमुळे नवी मुंबईच्या विकासाला अधिक चांगली दिशा मिळून हे शहर**

**गुंतवणूकदारांना आणि नागरिकांना आकर्षित करणारे शहर बनेल**, असा विश्वासही मा. मुख्यमंत्र्यांनी या वेळी व्यक्त केला.

श्री. बाळासाहेब थोरात, मा. मंत्री, महसूल यांनी **कांजूरमार्ग व कळंबोली येथे सिडकोकडून उभारण्यात आलेली कोविड समर्पित आरोग्य केंद्रे ही आपण कोविडच्या संकटाविरुद्ध लढण्यास सदैव सज्ज आहोत, याची निदर्शक असल्याचे सांगत सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समिटच्या माध्यमातून सिडको नवी मुंबईमध्ये करीत असलेली विकासकामे सर्वांपर्यंत पोहोचणार आहेत,** असा विश्वास व्यक्त केला.

श्री. एकनाथ शिंदे, मा. पालकमंत्री, ठाणे तथा मंत्री, नगर विकास यांनी या प्रसंगी **अल्प काळात कळंबोली आणि कांजूरमार्ग येथे सुसज्ज अशी कोविड समर्पित आरोग्य केंद्रे विकसित केल्याबद्दल सिडकोचे अभिनंदन करून, सिडकोकडून राबविण्यात येणारे विकास प्रकल्प राज्याच्या विकासातही योगदान देणारे ठरतील, असे मत व्यक्त केले. तसेच सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समिटच्या माध्यमातून नवी मुंबईमध्ये गुंतवणुकीला मोठ्या प्रमाणावर वाव असल्याचे अधोरेखित होत आहे,** असेही ते म्हणाले.

श्रीमती आदिती तटकरे, मा. पालकमंत्री, रायगड **यांनी या प्रसंगी बोलताना कळंबोली येथील कोविड समर्पित आरोग्य केंद्राच्या रूपाने कोविड रुग्णांवर उपचार करण्याकरिता एक सुसज्ज रुग्णालय उपलब्ध झाले असल्याचे सांगून या केंद्रात लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक रुग्णांकरिता स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल** समाधान व्यक्त केले.

डॉ. संजय मुखर्जी यांनी आपल्या स्वागतपर भाषणात **कोविड समर्पित आरोग्य केंद्रांद्वारे देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती दिली तसेच सिडको इन्व्हेस्टमेन्ट ॲन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समिटद्वारे नवी मुंबईकडे आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार आकर्षित होतील**, असा विश्वास व्यक्त केला.

एप्रिल २०२१ च्या सुमारास कोविड-१९ च्या दुसर्या लाटेचा धोका लक्षात घेऊन, महाराष्ट्र शासनाने सिडकोला नवी मुंबईतील कळंबोली येथील कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेडच्या गोडाऊनमध्ये ६३५ खाटांचे आणि मुंबईतील कांजूरमार्ग येथील ओल्ड क्रॉम्प्टन ग्रीव्हज फॅक्टरी येथे १७३८ खाटांचे कोविड समर्पित आरोग्य केंद्रे उभारण्याचे निर्देश दिले होते. राज्य शासनाच्या निर्देशांनुसार त्वरेने कार्यवाही करीत सिडकोने विक्रमी वेळेत या कोविड आरोग्य केंद्रांची उभारणी केली.

कळंबोली येथील कोविड आरोग्य केंद्र पूर्णपणे वातानुकूलित असून या केंद्रामध्ये एकूण ६३५ खाटा असून त्यात ५०५ ऑक्सिजनयुक्त खाटा, १२५ आयसीयू खाटा, (यातील २५ आयसीयू खाटा लहान मुलांसाठी समर्पित आहे), तसेच ५ खाटा या आपत्कालीन कक्षासाठी राखीव असणार आहेत. रुग्णालयात दाखल केलेल्या अर्भकांची तसेच लहान मुलांची काळजी घेण्यासाठी २४ खाटांचे मदर लाउंज सुद्धा प्रस्थापित केले आहे. त्याचप्रमाणे, संपर्क रहित तपासणी कक्ष, डॉक्टर आणि रुग्णांसाठी स्वतंत्र प्रवेश मार्ग, रूग्णांच्या देखरेखीसाठी आणि उपचारांसाठी हे आरोग्यकेंद्र सीसीटीव्ही, पब्लिक अॅड्रेस सिस्टीम, आवश्यक आयटी इन्फ्रास्ट्रक्चर व वायफाय प्रणाली इ. सुविधाही विकसित करण्यात आल्या आहेत. कांजूरमार्ग येथील कोविड आरोग्य केंद्रामध्ये १,७३८ खाटांपैकी ऑक्सिजनयुक्त ११५६ खाटा, ३७२ विलगीकरण खाटा, तसेच १० खाटा या आपत्कालीन कक्षासाठी राखीव असणार आहेत. रुग्णालयात दाखल केलेल्या अर्भकांची तसेच लहान मुलांची काळजी घेण्यासाठी ४४ खाटांचे मदर लाउंज सुद्धा प्रस्थापित केले आहे. त्याचप्रमाणे २१० अतिदक्षता खाटा असून यातील ५० आयसीयू खाटा लहान मुलांसाठी समर्पित आहे. सदर कोविड केंद्रांचे ई-लोकार्पण करण्यात येऊन सिडकोकडून या केंद्रांचे संबंधित महानगरपालिकांना हस्तांतरण करण्यात आले आहे.

सिडकोने आयोजित केलेल्या सिडको इन्व्हेस्टमेन्ट अॅन्ड इन्फ्रास्ट्रक्चर समीट (व्हर्च्युअल-आभासी) नवी मुंबईतील गुंतवणुकीच्या विविध संधी, नवी मुंबईचे वर्तमान आणि भविष्य, नवी मुंबई हे गुंतवणुकीसाठी आदर्श शहर का आहे, नवी मुंबईतील आरोग्य, शिक्षण, क्रीडा व परिसंस्था, नवी मुंबईला लाभलेली परिवहन संधानता, अशा विविध विषयांवर चर्चा करत तज्ज्ञांनी आपले विचार मांडले.

या ई-लोकार्पण आणि ई-अनावरण कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी तर सूत्रसंचालन श्रीमती प्रिया रातांबे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**